# आशिया व अफ्रीका खांडातील बंधमुक्ती

## अ. आशिया

खलील प्रशनंची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा

प्र.२. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा.

**पार्श्वभूमी**

**१. आशिया खंडाची संक्षिप्त माहिती लिहा.**

**उत्तर:** i. आशिया खंड हा जगातील सात खंडांत क्षेत्रफळ व लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वांत मोठा खंड आहे.

ii. जगातील प्राचीन धर्म व संस्कृतीचा उदय याच खंडात झाला.

iii. ग्रीकांनी 'सूर्य उगवणाऱ्या दिशेचा' म्हणून या खंडास 'आसू' असे नाव दिले.

**युरोपियन वसाहतवादाची प्रक्रिया**

**२. युरोपीय राष्ट्रांनी आशियात साम्राज्यवाद कसा निर्माण केला?**

**उत्तर:** i. युरोपीय राष्ट्रांनी आशिया खंडात वसाहतवाद निर्माण करून साम्राज्यवाद प्रस्थापित केला.

ii. औद्योगिकीकरण, आर्थिक वर्चस्व, राष्ट्रीय श्रेष्ठत्व, आक्रमक राष्ट्रवाद यांमधून साम्राज्यवादाची निर्मिती झाली.

iii. युरोपियन राष्ट्रांनी आशिया खंडातील सत्ता बळजबरीने आपल्या हातात केंद्रित करून त्या राष्ट्रांचे सार्वभौमत्व नियंत्रणाखाली आणले.

***३. आधुनिक साम्राज्यवादाचे स्वरूप कसे होते?**

**उत्तर:** i. जुन्या साम्राज्यवादापेक्षा आधुनिक साम्राज्यवादाचे स्वरूप आक्रमक होते.

ii. आधुनिक साम्राज्यवादामध्ये साम्राज्य-विस्ताराबरोबर राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व औद्योगिक वर्चस्व प्रस्थापित करणे हा हेतू होता.

## आशियातील साम्राज्यवाद

**४. युरोपियन साम्राज्यवाद हुकूमती आणि आक्रमक का होता?**

**उत्तर:** युरोपियन साम्राज्यवाद हुकूमती आणि आक्रमक होता, कारण युरोपियनांमध्ये राष्ट्रीय श्रेष्ठत्व, आक्रमक राष्ट्रवादाची भावना, प्रगत व उच्च दर्जाचे युद्धसाहित्य, प्रशिक्षित लष्कर होते.

## राष्ट्रवादी भावनेचा उदय

***५. युरोपियनांच्या सहवासामुळे आशिया खंडातील लोकांना कोणत्या विचारसरणीची जाणीव झाली?**

**उत्तर:** i. युरोपीय साम्राज्यवादामुळे आशिया खंडातील लोकांच्या मनात उदारमतवादी विचारसरणीची जाणीव झाली.

ii. आशिया खंडातील लोकांना पाश्चिमात्य संस्कृती आणि शिक्षणाची ओळख झाली.

iii. यामुळेच त्यांना राष्ट्रवाद, स्वयंशासन, लोकशाही, मानवतावाद, समता, सामाजिक न्याय या मूल्यांचे महत्त्व लक्षात आले.

iv. आपल्या आर्थिक दुरावस्थेला वसाहतवादी युरोपियन सत्ताच जबाबदार असल्याची जाणीव भारतीयांना झाली.

## निर्वसाहतीकरण

**६. दुसऱ्या महायुद्धानंतर कोणती संघटना अस्तित्वात आली? तिची निर्वसाहतीकरणात काय भूमिका होती?**

**उत्तर:** i. दुसऱ्या महायुद्धानंतर युद्धजन्य परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'संयुक्त राष्ट्रसंघ' ही संघटना स्थापन करण्यात आली.

ii. या संघटनेने वसाहतवादाला विरोध करत निर्वसाहतीकरणाचे कार्य हाती घेतले.

## राष्ट्रवादाचा उदय

***७. ब्रिटिशांनी भारतात राज्यकारभाराच्या सोयीसाठी कोणत्या सुधारणा केल्या?**

**उत्तर:** ब्रिटिशांनी भारतात राज्यकारभारासाठी पुढील सुधारणा घडवून आणल्या:

i. रेल्वे, रस्ते, टपाल यांसारख्या दळणवळणाच्या क्षेत्रांत क्रांती घडवून आणली.

ii. पाश्चात्त्य शिक्षणाची सुरुवात केली.

iii. छापखाने काढून विविध विषयांवरील ग्रंथनिर्मितीस सुरुवात केली. वर्तमानपत्रे व नियतकालिके काढली.

iv. ब्रिटिशांनी भारतात राज्यकारभाराच्या सोयीसाठी एकछत्री अंमल प्रस्थापित केला व समान कायदा पद्धती अस्तित्वात आणली.

**८. वर्तमानपत्रे आणि नियतकालिके यांमुळे राष्ट्रवादाच्या भावनेला चालना कशी मिळाली?**

**उत्तर:** i. वर्तमानपत्रे आणि नियतकालिके यांमुळे भारतीयांना स्वातंत्र्य, समता, मानवता, बुद्धिनिष्ठा, विज्ञाननिष्ठा, लोकशाही, राष्ट्रवाद इत्यादी मूल्यांची जाणीव झाली.

ii. यामुळे, ब्रिटिशांच्या शोषणाविरुद्ध भारतीयांत चीड निर्माण होऊन राष्ट्रवादाच्या भावनेला चालना मिळाली.

## राष्ट्रीय सभेची स्थापना

**९. राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यासाठी ॲलन ह्यूम यांना सहकार्य केलेल्या अधिकाऱ्यांची नावे सांगा.**

**उत्तर:** राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यासाठी ॲलन ह्यूम यांना 'सर विल्यम वेडरबर्न' व 'सर हेन्री कॉटन' या दोन सेवानिवृत्त इंग्रज अधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

**१०. राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनातील प्रतिनिधींची नावे लिहा.**

**उत्तर:** राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनात दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, फिरोजशहा मेहता, न्या. तेलंग, दिनशॉ वाँच्छा, नरेंद्रनाथ सेन, गिरीजाभूषण मुखर्जी, न्या. रानडे, डॉ. आर. जी. भांडारकर, गोपाळ गणेश आगरकर, रंगय्या नायडू, जी. सुब्रह्मण्यम् अय्यर, वीर राघवाचार्य, आनंदा चार्लू, गंगाप्रसाद वर्मा, मोतीलाल नेहरू आणि एन. जी. चंदावरकर यांचा समावेश होता.

## मवाळ कालखंड (इ.स. १८८५ ते १९०५)

---

**११. मवाळ नेत्यांची विचारपद्धती काय होती?**

**उत्तर:** i. ब्रिटिशांकडे अर्ज, विनंत्या करून सनदशीर मार्गाने मागण्या मान्य करून घ्याव्यात अशी मवाळांची विचारसरणी होती.

ii. मवाळ नेत्यांचा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास होता.

iii. ब्रिटिश सत्तेला विरोध न करता सामोपचाराच्या मार्गाने आपल्या मागण्या मान्य करून घेता येतील असा त्यांचा विश्वास होता.

**१२. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मवाळवादी नेत्यांची काय भूमिका होती?**

**उत्तर:** i. मवाळवादी नेत्यांनी राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून भारतीयांची राजकीय गाऱ्हाणी मांडून ब्रिटिश सरकारचे त्याकडे लक्ष वेधले. जनतेच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली.

ii. भारतीय जनतेमध्ये जनजागृती निर्माण करून राष्ट्रवादी चळवळीची पायाभरणी केली.

## जहाल कालखंड (इ.स. १९०५ ते १९२०)

**१३. कोणते जहाल मतवादी नेते लाल, बाल आणि पाल म्हणून ओळखले जात होते?**

**उत्तर:** लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक आणि बिपीनचंद्र पाल हे जहाल मतवादी नेते लाल, बाल आणि पाल म्हणून ओळखले जात होते.

**१४. जहालमतवादी नेत्यांनी कोणत्या तत्त्वांचा पुरस्कार केला?**

**उत्तर:** जहालमतवादी नेत्यांनी पुढील चार तत्त्वांचा पुरस्कार केला.

i. स्वराज्य

ii. स्वदेशी

iii. विदेशी मालावर बहिष्कार

iv. राष्ट्रीय शिक्षण

## क्रांतिकारी चळवळ

***१५. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी क्रांतिकारकांनी कोणता कार्यक्रम आखला?**

**[मार्च १४, ऑक्टोबर १४]**

**उत्तर:** i. क्रांतिकारी चळवळींमुळे भारतीयांमध्ये आत्यंतिक राष्ट्रभावनेचा उदय झाला.

ii. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी हिंसा, त्याग, आत्मबलिदानाशिवाय दुसरा मार्ग नाही अशी क्रांतिकाऱ्यांची विचारसरणी होती.

iii. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी जुलमी राज्यकर्त्यांची हत्या करून ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या मनात दहशत निर्माण करणे. गुप्तसंघटना उभारणे, शस्त्रास्त्रे तयार करणे, प्रशिक्षण देणे व परदेशातून शस्त्रे आयात करणे असा कार्यक्रम क्रांतिकारकांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आखला होता.

## असहकार चळवळीची पार्श्वभूमी

**१६. रौलट समितीच्या अहवालानुसार ब्रिटिश सरकारने कोणती विधेयके संमत केली?**

**उत्तर:** रौलट समितीच्या अहवालानुसार ब्रिटिश सरकारने दोन विधेयके संमत केली:

i. राजद्रोही व्यक्तीवरील खटला हायकोर्टाच्या तीन न्यायाधिशांच्या खास न्यायालयात गुप्तपणे चालविण्याची तरतूद. तसेच या न्यायालयाच्या निर्णयाविरोधात अपील करता येणार नाही.

ii. कोणत्याही संशयित व्यक्तीस विनाचौकशी अटक करण्याचा व त्या व्यक्तीवर खटला न भरता कितीही दिवस तुरुंगात ठेवण्याचा अधिकार होता.

## असहकार चळवळ

**१७. असहकार चळवळीचे मुख्य उद्दिष्ट काय होते?**

**उत्तर:** ब्रिटिश माल, सरकारी कार्यालय व न्यायालये, ब्रिटिश शाळा, महाविद्यालये, पदव्या व मानसन्मान, कायदेमंडळाच्या निवडणुका यांवर बहिष्कार हे असहकार चळवळीचे मुख्य उद्दिष्ट होते.

## सविनय कायदेभंग

**१८. सविनय कायदेभंग चळवळीचे ध्येय काय होते?**

**उत्तर:** ब्रिटिशांनी केलेल्या अन्यायी, अत्याचारी कायद्याचा भंग करणे हे सविनय कायदेभंग चळवळीचे ध्येय होते.

## चले जाव चळवळ

**१९. भारतात प्रतिसरकारे कोठे स्थापन झाली?**

**उत्तर:** महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यात, बिहारमध्ये पूर्णिया, उत्तर प्रदेशात बलिया, बंगालमध्ये मिदनापूर येथे प्रतिसरकारे स्थापन झाली.

## चीन

**२०. चीनमध्ये राष्ट्रवादी भावना कशी वाढीस लागली?**

**उत्तर:**

i. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात चीनमधील मांचू राजवट दुर्बल झाली.

ii. याचा फायदा घेऊन पाश्चिमात्य देशांनी चीनमध्ये प्रवेश मिळवला आणि चीनच्या शोषणास सुरुवात केली.

iii. मांचू राजवटीचा भ्रष्ट व अकार्यक्षम कारभार, जपानने केलेला चीनचा पराभव आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या पडलेल्या प्रभावामुळे चीनमध्ये प्रबोधन घडून आले.

iv. या प्रबोधनातून तायपिंगचे बंड व बॉक्सरचा उठाव हे अयशस्वी उठाव घडून आले.

परंतु, या घटनांतून चीनमध्ये राष्ट्रवादी भावना वाढीस लागली.

## प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा.

### पार्श्वभूमी

**१. प्रबोधनाच्या चळवळींनी युरोपीय लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आले.**

**उत्तर:** i. पंधराव्या शतकानंतर आधुनिक युगाचा प्रारंभ झाला. युरोपात प्रबोधनाची चळवळ अस्तित्वात आल्यामुळे युरोपियन राष्ट्रांच्या प्रगतीला सुरुवात झाली.

ii. या चळवळींमुळे युरोपियनांनी अज्ञान व अंधश्रद्धेला मूठमाती दिली.

iii. परिणामी त्यांची जिज्ञासा आणि चिकित्सकवृत्ती वाढली.

iv. यातून ज्ञानग्रहण करण्याची वृत्ती व नवे शोधण्याची दृष्टी निर्माण झाली.

v. युरोपियन राष्ट्रांनी आशिया, आफ्रिका खंडांकडे जाणाऱ्या जलमार्गाचा शोध लावला.

अशा प्रकारे, प्रबोधनाच्या चळवळींनी युरोपीय लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आले.

## युरोपियन वसाहतवादाची प्रक्रिया

***२. युरोपियन राष्ट्रांनी आशिया खंडात वसाहती स्थापन केल्या.**

**उत्तर:** i. १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये सर्वप्रथम औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली आणि त्यानंतर युरोपात या क्रांतीचा प्रसार झाला.

ii. औद्योगिक क्रांतीनंतर मोठमोठे कारखाने उभे राहिले. माणसाची जागा यंत्रांने घेतली.

iii. युरोपियन राष्ट्रांना यंत्रांची चाके सतत गतिमान ठेवण्यासाठी कच्च्या मालाची आवश्यकता आणि पक्क्या मालाच्या विक्रीसाठी हक्काच्या बाजारपेठेची गरज होती.

iv. म्हणून, युरोपियन राष्ट्रांनी नवीन प्रदेशांचा शोध सुरू केला.

v. आशिया खंड कच्च्या मालांनी संपन्न असल्यामुळे साम्राज्यवादासाठी अतिशय उपयुक्त होता.

या सर्व कारणांमुळे युरोपियन राष्ट्रांनी आशिया खंडात वसाहती स्थापन केल्या व सर्व सत्ता आपल्या हातात घेतली.

## आशियातील साम्राज्यवाद

***३. आशिया खंडात साम्राज्यवाद निर्माण करताना युरोपियनांना विरोध झाला नाही.**

**उत्तर:** आशिया खंडात साम्राज्यवाद निर्माण करताना युरोपियनांना विरोध झाला नाही कारण:

i. आशिया खंडातील देश मागास व अप्रगत होते. त्यांच्यामध्ये राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा अभाव होता.

ii. आशिया खंडातील राज्यकर्त्यांमध्ये अंतर्गत दुही व फंदफितुरी होती.

iii. युरोपियनांमध्ये राष्ट्रीय श्रेष्ठत्व, आक्रमक राष्ट्रवादाची भावना, प्रगत व उच्च दर्जाचे युद्धसाहित्य तसेच प्रशिक्षित लष्कर होते.

**४. संयुक्त राष्ट्रसंघ ही वसाहतवादाला विरोध करणारी महत्त्वाची संस्था बनली.**

**उत्तर:** i. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली.

ii. संयुक्त राष्ट्रसंघाने साम्राज्यवादाला विरोध केला व निर्वसाहतीकरणाचे काम हाती घेतले.

iii. इ.स. १९५५ मध्ये बांडुंग येथे भरलेल्या अलिप्त राष्ट्रगटाच्या परिषदेत आशिया, आफ्रिका खंडांतील स्वतंत्र राष्ट्रांच्या २५ प्रतिनिधींनी वसाहतवादाला विरोध केला.

iv. इ.स. १९६१ साली संयुक्त राष्ट्रसंघाची एक विशेष समिती निर्वसाहतीकरणाच्या उद्देशाने स्थापन झाली. आमसभेने वसाहतींवरील ताबा सोडण्याचे आवाहन केले.

अशा प्रकारे, संयुक्त राष्ट्रसंघ ही वसाहतवादाला विरोध करणारी महत्त्वाची संस्था बनली.

***५. महात्मा गांधींनी असहकार चळवळ स्थगित केली.**

**[जुलै १६]**

**उत्तर:** i. महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारच्या विरोधात १९२० मध्ये असहकार चळवळ सुरू केली होती.

ii. असहकार चळवळीत ब्रिटिश मालावर बहिष्कार, सरकारी कार्यालय, शाळा, महाविद्यालय, पदव्या, मानसन्मान, कायदेमंडळाच्या निवडणुका इ. वर बहिष्कार घालण्याचे ठरले.

iii. असहकार चळवळ दडपण्यासाठी उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा येथे काढण्यात आलेल्या शांततापूर्ण मिरवणुकीवर ब्रिटिश पोलिसांनी गोळीबार केला.

iv. तेव्हा संतप्त जमावाने पोलीस चौकीला आग लावली.

v. या आगीमध्ये एका पोलीस अधिकाऱ्यासह २२ पोलीस ठार झाले.

vi. गांधीजी या घटनेने अतिशय व्यथित झाले व १९२२ मध्ये त्यांनी असहकार चळवळ स्थगित केली.

## प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा.

### युरोपियन वसाहतवादाची प्रक्रिया

***१. जुना साम्राज्यवाद हा आधुनिक साम्राज्यवादापेक्षा भिन्न होता, स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. युरोपियन राष्ट्रांनी १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत आशिया खंडात वसाहती निर्माण करून साम्राज्यवाद प्रस्थापित केला.

ii. औद्योगिकीकरण, आर्थिक वर्चस्व, राष्ट्रीय श्रेष्ठत्व, आक्रमक राष्ट्रवाद यांमधून आधुनिक साम्राज्यवादाची निर्मिती झाली.

iii. ग्रीक व रोमन सत्तांनीही आपल्या राजवटी आशिया खंडात प्रस्थापित केल्या होत्या; परंतु त्यांचा साम्राज्यवाद अतिशय मर्यादित स्वरूपाचा होता.

iv. त्यामध्ये केवळ एका राजाने दुसऱ्या राज्यावर आक्रमण करून ते राज्य आपल्या राजकीय वर्चस्वाखाली आणणे एवढाच मर्यादित उद्देश होता.

v. जुन्या साम्राज्यवादापेक्षा आधुनिक साम्राज्यवादाचे स्वरूप जास्त आक्रमक होते.

vi. आधुनिक साम्राज्यवादामध्ये फक्त साम्राज्यविस्तार अपेक्षित नव्हता, तर राजकीय वर्चस्वाबरोबर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व औद्योगिक वर्चस्व प्रस्थापित करणे हा हेतू होता.

## निर्वसाहतीकरण

***२. निर्वसाहतीकरणाचे युग म्हणजे काय?**

**उत्तर:** i. युरोपियन राष्ट्रांनी आशिया व आफ्रिका खंडामध्ये त्यांच्या वसाहती निर्माण केल्या.

ii. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपियन राष्ट्रांनी निर्वसाहतीकरणास सुरुवात केली.

iii. निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेत साम्राज्यवादी राष्ट्रांनी आपल्या ताब्यातील वसाहतींना स्वातंत्र्य दिले.

iv. २० व्या शतकाच्या अंतापर्यंत आशिया व आफ्रिका खंडाचे निर्वसाहतीकरण झाले. यामुळेच या काळाला 'निर्वसाहतीकरणाचे युग' असे म्हणतात.

**३. जहाल मतवादी मवाळ मतवाद्यांपेक्षा कसे वेगळे होते?**

**उत्तर:** i. जहालांची विचारसरणी मवाळ विचारसरणीपेक्षा भिन्न स्वरूपाची होती.

ii. मवाळांचा सनदशीर मार्ग जहालांना मान्य नव्हता.

iii. जहालांचा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास नव्हता.

iv. आपल्या मागण्या सनदशीर मार्गाऐवजी आक्रमकपणे मांडून ब्रिटिश सरकारच्या अन्यायी व जुलमी धोरणांचा जहाल मतवादींनी प्रतिकार केला.

***४. बंगालच्या फाळणीची माहिती लिहा.**

**उत्तर:** i. राष्ट्रीय चळवळ दडपण्यासाठी ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब केला.

ii. व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन याने १६ ऑक्टोबर १९०५ या दिवशी प्रशासकीय अडचण हे कारण दाखवून बंगालची फाळणी जाहीर केली.

iii. हिंदू-मुस्लिम यांच्यात फूट पाडून राष्ट्रीय चळवळ कमकुवत करणे हा त्यामागील उद्देश होता.

iv. बंगालच्या फाळणीविरोधात वंगभंग आंदोलन उदयास आले.

v. ही चळवळ हळूहळू संपूर्ण देशभर पसरली.

vi. प्रमुख नेत्यांना तुरुंगात टाकूनही आंदोलनाची तीव्रता कमी झाली नाही.

vii. १२ डिसेंबर १९११ रोजी ब्रिटिश सम्राट पंचम जॉर्जने दिल्ली येथे भव्य दरबार भरवून फाळणी रद्द केल्याची घोषणा केली.

## होमरूल चळवळ

**५. होमरूल चळवळ म्हणजे काय?**

**उत्तर:** i. आपल्या देशाचा कारभार करण्याचा अधिकार मिळविण्यासाठी जी चळवळ उदयाला आली, तिला 'होमरूल चळवळ' म्हणतात.

ii. इंग्लंडच्या जोखडातून मुक्त होऊन स्वराज्याचे अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी आयर्लंडमध्ये ही चळवळ सुरू झाली होती.

iii. आयर्लंड आणि भारताची राजकीय परिस्थिती सारखीच असल्याने ब्रिटिश सरकारच्या विरोधात भारतात होमरूल चळवळ करण्याचा विचार करण्यात आला.

iv. होमरूल चळवळीचा विचार डॉ. ॲनी बेझंट यांनी प्रथम मांडला व लोकमान्य टिळकांनी नंतर या चळवळीचा जोरदार पुरस्कार करून होमरूल चळवळ व्यापक बनवली.

## गांधीयुग

**६. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चळवळीत कोणते महत्त्वाचे बदल घडून आले?**

उत्तर: i. १ ऑगस्ट १९२० रोजी टिळकयुग संपून गांधी-युगाची सुरुवात झाली.

ii. गांधीजींनी ब्रिटिशांशी लढा देण्यासाठी सत्य, अहिंसा, सत्याग्रह या सूत्रांचा अवलंब केला.

iii. गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सभेने ब्रिटिशांच्या विरोधात असहकार चळवळ, सविनय कायदेभंग आणि चलेजाव चळवळ उभारून ब्रिटिशांचा प्रतिकार केला.

iv. या चळवळींमुळे स्वातंत्र्य लढा सशक्त झाला.

## असहकार चळवळीची पार्श्वभूमी

**७. रौलट कायद्याविषयी लिहा.**

उत्तर: i. भारतीय क्रांतिकारकांच्या राजद्रोही कारवाया रोखता येतील या उद्देशाने इ.स. १९१९ मध्ये रौलट कायदा पास करण्यात आला.

ii. रौलट कायदा समितीच्या अहवालानुसार ब्रिटिश सरकारने दोन विधेयके संमत केली.

iii. या विधेयकांनुसार,

अ. राजद्रोही व्यक्तीवरील खटला हायकोर्टाच्या तीन न्यायाधीशांच्या खास न्यायालयात गुप्तपणे चालविण्याची तरतूद करून या न्यायालयाच्या निर्णयाविरोधात अपील करता येणार नाही.

ब. संशयित व्यक्तीस विनाचौकशी अटक करण्याचा, त्या व्यक्तीवर खटला न भरता कितीही दिवस तुरुंगात ठेवण्याचा अधिकार होता.

iv. ही दोन्ही विधेयके व्यक्तिस्वातंत्र्याची व न्यायतत्त्वाची पायमल्ली करणारी होती.

v. हा कायदा अन्यायकारक असल्यामुळे लोक याला 'काळा कायदा' असे म्हणत.

***८. जालियनवाला बाग हत्याकांडाची माहिती लिहा.**

**[मार्च १४]**

**उत्तर:** इ.स. १९१९ मध्ये अन्यायकारक व अयोग्य असा रौलट ॲक्ट पास करण्यात आला.

i. रौलट कायद्याच्या विरोधात उभारण्यात आलेल्या सत्याग्रही लढ्याने पंजाब प्रांतात प्रखर रूप धारण केले. ब्रिटिशांनी दडपशाहीचे सत्र सुरू केले.

ii. डॉ. सत्यपाल व डॉ. सैफुद्दीन किचलू या नेत्यांना हद्दपार केले. म. गांधींना पंजाब प्रांतात प्रवेशबंदी केली.

iii. जनतेमध्ये दहशत बसविण्यासाठी अमृतसरमध्ये लष्कराला पाचारण करण्यात आले. तसेच सभाबंदीचा आदेशही देण्यात आला.

iv. या घटनेच्या निषेधार्थ १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर येथील जालियनवाला मैदानात सभा आयोजित करण्यात आली.

v. या सभेला मोठ्या संख्येने लोक एकत्र आले होते. इंग्रज अधिकारी जनरल डायरने सभेसाठी जमलेल्या लोकांवर अमानुष गोळीबार केला.

vi. शेकडो लोक मृत्यू पावले आणि अनेकजण जखमी झाले.

vii. या घटनेचा निषेध म्हणून रवींद्रनाथ टागोरांनी ब्रिटिश शासनाने दिलेल्या 'सर' पदवीचा त्याग केला.

viii. तर महात्मा गांधींनी "अशा प्रकारचे हत्याकांड घडविणाऱ्या सरकारशी सहकार्य करणे म्हणजे सैतानाशी सहकार्य करणे होय." असे उद्गार काढले. भारतीयांनी या अमानुष हत्याकांडाच्या चौकशीची मागणी केली.

## आझाद हिंद सेना

---

**९. आझाद हिंद सेनेबद्दल माहिती द्या.**

**उत्तर:** i. चलेजाव चळवळीचा प्रसार भारताबाहेर आग्नेय आशिया, चीन, जपानमध्ये स्थायिक झालेल्या भारतीयांपर्यंत झाला.

ii. या चळवळीपासून प्रेरणा घेऊन रासबिहारी बोस यांनी जपानमध्ये आझाद हिंद सेनेची स्थापना केली.

iii. पुढे या संघटनेचे नेतृत्व सुभाषचंद्र बोस यांनी समर्थपणे केले.

iv. त्यांनी 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दूँगा' असे लोकांना आवाहन केले.

v. आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून 'चलो दिल्ली' हा नारा दिला.

vi. ब्रिटिशविरोधी लढ्यासाठी इंग्लंडच्या शत्रूराष्ट्रांची-सुद्धा मदत घेण्याची तयारी त्यांनी केली होती.

**१०. भारत हे लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून कसे उदयास आले?**

**उत्तर:** i. दीर्घकाळ चाललेल्या लढ्यानंतर, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले.

ii. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित नेहरूंनी सत्तासूत्रे हाती घेतली.

iii. डॉ. राजेंद्र प्रसाद भारताचे पहिले राष्ट्रपती झाले.

iv. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीची स्थापना झाली.

v. डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या अथक परिश्रमातून निर्माण झालेली भारताची राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आली.

अशा प्रकारे, जगाच्या इतिहासात भारत हे लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून उदयास आले.

**११. कोमिंगटांग पक्षाविषयी माहिती लिहा.**

**उत्तर:** i. हँको येथील बॉम्बस्फोटाने चीनमध्ये क्रांतीची सुरुवात झाली आणि कोमिंगटांग पक्षाने चीनच्या काही भागांत वर्चस्व मिळवले.

ii. डॉ. सन्-येत्-सेन यांनी प्रजासत्ताकाची घोषणा करून ते स्वत: अध्यक्ष झाले. चीनमधील क्रांतीने मांचू राजवट नष्ट झाल्याने डॉ. सन्-येत्-सेन यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व युवान-शि-कोई यांच्याकडे जबाबदारी सोपविली.

iii. पहिल्या महायुद्धाच्या काळात जपानने चीनसमोर २१ मागण्या ठेवल्या. चीनने या मागण्या फेटाळून मित्र राष्ट्रांचा पाठिंबा मिळवला.

iv. कोमिंगटांग पक्षाची ताकद वाढल्याने कॅन्टन शहरावर ताबा मिळवून प्रजासत्ताक स्थापन केले.

v. डॉ. सन्-येत्-सेन यांनी लोकशाही, राष्ट्रवाद आणि जनकल्याण या तत्त्वज्ञानातून चिनी जनतेमध्ये जागृती करून लोकशाही तत्त्वाचा प्रसार केला.

**१२. माओ-त्से-तुंग वर टीप लिहा.**

**उत्तर:** i. माओ-त्से-तुंग हा चीनमधील साम्यवादी नेता होता.

ii. माओ-त्से-तुंग यांचे उच्च शिक्षण चालू असताना त्यांचा कांग-यु-वी, लिआंग-ची-चाओ, यांग-चांग, चेन-तु-त्सु या साम्यवादी विचारवंतांशी संबंध आला आणि ते साम्यवादी विचारांकडे वळले.

iii. त्यांनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली व शेतकऱ्यांना संघटित करून त्यांचे शोषण थांबविले.

iv. इ.स. १९४५ च्या दुसऱ्या महायुद्धातील पराभवाने, जपानचे चीनवरील वर्चस्व संपुष्टात आले.

v. माओ-त्से-तुंग यांना सोव्हिएत रशिया आणि अमेरिकेची मदत मिळाल्याने चीनचे सामर्थ्य वाढले. त्यांनी अमेरिकेच्या मदतीने राष्ट्रीय चीनची स्थापना केली.

vi. चिनी जनतेच्या पाठिंब्याने माओने 'लाल क्रांती' यशस्वी करून १ ऑक्टोबर १९४९ रोजी चीन प्रजासत्ताक अस्तित्वात आणल्याचे जाहीर केले.

vii. माओने चीनचा सर्व क्षेत्रांत विकास करून एक नवा अध्याय घडवून आणला. त्यामुळेच चीन हे राष्ट्र जगातील तिसरी महाशक्ती म्हणून उदयास आले.

## प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा.

### निर्वसाहतीकरणाला अनुकूल ठरलेली परिस्थिती

***१. निर्वसाहतीकरणाला अनुकूल ठरलेल्या परिस्थितीचे वर्णन करा.** **[मार्च १५]**

**उत्तर:** निर्वसाहतीकरणाला अनुकूल परिस्थिती निर्माण होण्यासाठी खालील घटना महत्त्वपूर्ण होत्या:

i. इ.स. १९०५ मध्ये जपानसारख्या छोट्या राष्ट्राने रशियासारख्या बलाढ्य राष्ट्राचा पराभव केला. युरोपियन राष्ट्रेही पराभूत होतात ही बाब आशियातील लोकांच्या लक्षात आल्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला.

ii. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन आणि फ्रॅन्कलिन रुझवेल्ट यांनी पुरस्कृत केलेल्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वामुळे वसाहतींमध्ये राष्ट्रवादी संघटना उदयाला आल्या. त्यांनी वसाहतींच्या राजकीय स्वातंत्र्याची मागणी केली.

iii. परकीय सत्तांच्या जाचातून आशिया खंडास मुक्त करणे हे आपले उदात्त कर्तव्य आहे. ही भूमिका घेऊन जपान युरोपियन वसाहतवादी राष्ट्रांच्या विरोधात उभे राहिले.

iv. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात आशिया खंडातील राष्ट्रांचे सैन्य दोस्त राष्ट्रांच्या बाजूने लढले. त्यामुळे युद्ध समाप्तीनंतर राजकीय स्वातंत्र्य मिळेल अशी त्यांना आशा होती.

v. दुसऱ्या महायुद्धातील प्रचंड आर्थिक हानीमुळे युरोपीय राष्ट्रे दुबळी झाली आणि वसाहती ताब्यात ठेवण्याचे सामर्थ्य त्यांच्यात उरले नाही.

vi. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर अमेरिका व रशिया या दोन उदयाला आलेल्या महासत्ता वसाहतवाद विरोधी होत्या.

## निर्वसाहतीकरण

---

**२. निर्वसाहतीकरणाचे फायदे स्पष्ट करा.**

**उत्तर:** दुसऱ्या महायुद्धानंतर जगात निर्वसाहतीकरणाच्या प्रकियेस प्रारंभ झाला, २० व्या शतकाच्या शेवटी अनेक राष्ट्रे पाश्चिमात्यांच्या ताब्यातून स्वतंत्र झाली.

**निर्वसाहतीकरणाचे फायदे:**

i. दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्र संघटना अस्तित्वात आली.

ii. संयुक्त राष्ट्रसंघ ही वसाहतवादाला विरोध करणारी महत्त्वाची संस्था बनली.

iii. इ.स. १९५५ मध्ये, बांडुंग येथे भरलेल्या अलिप्त राष्ट्रगटाच्या परिषदेमध्ये आशिया, आफ्रिका खंडातील स्वतंत्र राष्ट्रांच्या २५ प्रतिनिधींनी वसाहतवादाला विरोध केला.

iv. इ.स. १९६१ मध्ये, संयुक्त राष्ट्रसंघाची एक विशेष समिती निर्वसाहतीकरणासाठी स्थापन केली व आमसभेने वसाहतींवरील ताबा सोडण्याचे आवाहन केले.

v. परिणामी भारत, श्रीलंका, म्यानमार हे देश ब्रिटिशांच्या साम्राज्यवादातून मुक्त झाले.

vi. हो-चि-मिन्हच्या कुशल नेतृत्वाखाली इंडोचायना-मधील लोकांना पहिल्यांदा फ्रान्स व नंतर अमेरिकेबरोबर संघर्ष करावा लागला.

vii. इंडोनेशियन जनतेनेही डॉ. सुकार्नो यांच्या नेतृत्वाखाली डचांच्या विरोधात लढा दिला व इंडोनेशिया बंधमुक्त झाला.

**३. ब्रिटिशांनी भारतात आपले साम्राज्य कसे स्थापन केले?**

**उत्तर:** भारतातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेत ब्रिटिशांनी आपले साम्राज्य स्थापन केले:

i. **ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना:**

अ. १६ व्या शतकात लंडनमध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली.

ब. राणी एलिझाबेथ हिने पूर्वेकडील राष्ट्रांबरोबर व्यापार करण्याची परवानगी दिली.

क. ईस्ट इंडिया कंपनीने भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर व्यापारासाठी वखारी स्थापन केल्या.

ii. **देशातील राजकीय अस्थिरता:**

अ. ब्रिटिशांनी भारतात व्यापार करत असताना भारतीय लोकांच्या अज्ञान व मागासलेपणाचा फायदा घेऊन त्यांचे शोषण केले.

ब. भारतातील राजकीय अस्थिर परिस्थितीचा ब्रिटिशांनी फायदा घेतला.

क. इ.स. १७५७ च्या प्लासीच्या लढाईतील विजयाने ब्रिटिश सत्तेची मुहूर्तमेढ रोवली.

**iii. डलहौसीचे संस्थाने खालसा करण्याचे धोरण:**

अ. ब्रिटिश गर्व्हनर जनरल लॉर्ड डलहौसीने भारतातील लहान संस्थाने खालसा करण्याचे धोरण राबविले.

ब. परिणामी, भारतीय संस्थानिकांच्या मनात असंतोष उफाळून आला आणि यातूनच ब्रिटिश सत्तेच्या विरोधात इ.स. १८५७ चा उठाव घडून आला.

क. परंतु, ब्रिटिशांनी हा उठाव दडपण्याचा प्रयत्न केला.

ड. इंग्लंडच्या राणीने इ.स. १८५८ मध्ये जाहीरनामा प्रसिद्ध करून भारतातील ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता बरखास्त केली व सत्तेची सर्व सूत्रे इंग्लंडच्या पार्लमेंटकडे सोपविली.

**४. राष्ट्रीय सभेची स्थापना यावर टीप लिहा.**

**उत्तर:** i. ब्रिटिशांच्या अन्यायी धोरणाविरोधी मुंबई, मद्रास, बंगाल प्रांतात सुशिक्षित भारतीयांनी अनेक प्रादेशिक संघटना स्थापन केल्या.

ii. परंतु, सर्व देशांचे प्रतिनिधित्व करणारी एकही अखिल भारतीय राजकीय संघटना नव्हती.

iii. १८८५ मध्ये सेवानिवृत्त इंग्रज अधिकारी ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम यांच्या पुढाकारातून राष्ट्रीय सभेची स्थापना झाली.

iv. यासाठी त्यांना सर विल्यम वेडरबर्न व सर हेन्री कॉटन या दोन सेवानिवृत्त इंग्रज अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळाले.

v. राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईमध्ये गोकुळदास तेजपाल संस्कृत पाठशाळेच्या मैदानांवर भरले होते.

vi. राष्ट्रीय सभेच्या या पहिल्या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी थोर कायदेपंडित व विचारवंत व्योमेशचंद्र बॅनर्जी होते.

vii. या अधिवेशनासाठी ७२ प्रतिनिधी हजर होते.

**५. वंग-भंग चळवळ स्पष्ट करा. किंवा बंगालच्या फाळणीनंतर भारतीयांचे काय प्रतिसाद उमटले?**

**उत्तर:** i. ब्रिटिशांनी राष्ट्रीय चळवळ दडपण्यासाठी 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब केला.

ii. व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन याने इ. स. १९०५ मध्ये प्रशासकीय अडचण हे कारण दाखवून बंगालची फाळणी केली. या फाळणीमागचा त्याचा खरा हेतू हिंदू-मुस्लिम यांच्यात फूट पाडून राष्ट्रीय चळवळ कमकुवत करणे हा होता.

iii. बंगालच्या फाळणीविरोधात वंगभंग आंदोलन उदयास आले. या आंदोलनाचे नेतृत्व सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी केले.

iv. १६ ऑक्टोबर १९०५ साली बंगालची फाळणी अंमलात आणण्यात आली. हा दिवस 'राष्ट्रीय शोक' दिन म्हणून पाळण्यात आला.

v. रवींद्रनाथ टागोर यांनी ऐक्याचे प्रतीक म्हणून रक्षाबंधनाचा कार्यक्रम घेतला.

vi. लोकांनी स्वदेशीचा पुरस्कार करून परदेशी मालावर बहिष्कार घातला. सरकारी शाळा, महाविद्यालयांवर बहिष्कार टाकून राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा उघडण्यात आल्या.

vii. बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेले 'वंदे मातरम्' हे गीत अनेक तरुण गाऊ लागले.

viii. अल्पावधीमध्ये ही चळवळ राष्ट्रव्यापी बनली.

ix. ब्रिटिश सरकारने प्रमुख नेत्यांना तुरुंगात टाकले. तरीही आंदोलनाची तीव्रता कमी झाली नाही.

x. शेवटी १२ डिसेंबर १९११ रोजी, ब्रिटिश सम्राट पंचम जॉर्ज यांनी दिल्ली येथे दरबार भरवून बंगालची फाळणी रद्द केली.

## क्रांतिकारी चळवळ

**६. स्वातंत्र्यप्राप्तीमध्ये क्रांतिकारकांचे योगदान लिहा.**

**उत्तर:** i. क्रांतिकारकांमध्ये आत्यंतिक राष्ट्रवादी भावनेच्या विचारसरणीचा उदय झाला.

ii. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी हिंसा, त्याग आत्मबलिदानाशिवाय दुसरा मार्ग नाही अशी क्रांतिकारी नेत्यांची विचारसरणी होती.

iii. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी जुलमी राज्यकर्त्यांची हत्या करून ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या मनात दहशत निर्माण करणे, गुप्तसंघटना उभारणे, शस्त्रास्त्रे तयार करणे, प्रशिक्षण देणे व परदेशातून शस्त्रे आयात करणे हा क्रांतिकारकांचा कार्यक्रम होता.

iv. या क्रांतिकारकांमध्ये वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधू, अनंत लक्ष्मण कान्हेरे, सेनापती बापट, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, खुदीराम बोस, मदनलाल धिंग्रा, रामप्रसाद बिस्मिल, अशफाकउल्ला खाँ हे पुरुष क्रांतिकारी होते.

v. कल्पना दत्त, प्रितीलता वड्डेदार, शांती घोष, सुनिती चौधरी, मादाम कामा आदी महिला क्रांतिकारक होत्या.

vi. या क्रांतिकारकांच्या कार्यामुळे राष्ट्रीय भावना वाढीस लागली व स्वातंत्र्य चळवळ गतिमान झाली.

**७. असहकार चळवळीवर टीप लिहा.**

**उत्तर:** i. कोणतीही राजवट जनतेच्या सहकार्यावरच अवलंबून असते. जनता राजवटीस सहकार्य करत नसेल, तर ती राजवट नष्ट होत असते.

ii. या विचारानुसार महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारच्या विरोधात असहकार चळवळ करण्याचे ठरविले.

iii. इ.स. १९२० च्या नागपूर येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात असहकाराचा ठराव संमत झाला.

iv. या असहकार चळवळीत ब्रिटिश मालावर, सरकारी कार्यालय व न्यायालयांवर, ब्रिटिश शाळा, महाविद्यालये, पदव्या, मानसन्मान व कायदेमंडळाच्या निवडणुकांवर बहिष्कार इ. कार्यक्रम राबविण्यात आले.

v. उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यात चौरीचौरा येथे काढण्यात आलेल्या शांततापूर्ण मिरवणुकीवर ब्रिटिश पोलिसांनी गोळीबार करून दडपशाहीचा अवलंब केला.

vi. संतप्त जमावाने पोलीस चौकीला आग लावली.

vii. या आगीमध्ये एक पोलीस अधिकारी आणि २२ पोलीस ठार झाले.

viii. गांधीजींनी या घटनेने व्यथित होऊन इ.स. १९२२ मध्ये असहकार चळवळ स्थगित केली.

ix. गांधीजींना यानंतर अटक करण्यात आली.

## सविनय कायदेभंग

**८. सविनय कायदेभंगाची चळवळ स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. १९३० साली महात्मा गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.

ii. ब्रिटिश सरकारने केलेल्या अन्यायी, अत्याचारी कायद्याचा भंग करणे म्हणजे सविनय कायदेभंग होय.

iii. ब्रिटिश सरकारने केलेला मिठाचा कायदा मोडून काढण्यासाठी गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ चालू केली.

iv. गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहासाठी गुजरातमधील दांडी हे गाव निश्चित केले.

v. १२ मार्च १९३०, रोजी आपल्या निवडक अनुयायांसह गांधीजींनी साबरमती ते दांडी वाटचाल सुरू केली आणि ३८५ किमी अंतर २५ दिवसांत चालून पूर्ण केले.

vi. ६ एप्रिल १९३० रोजी दांडीच्या समुद्रकिनाऱ्यावरील मीठ उचलून त्यांनी कायदेभंग केला व देशभर कायदेभंगाच्या चळवळीला सुरुवात झाली.

vii. सविनय कायदेभंगाच्या चळवळीमध्ये सरोजिनी नायडू यांनी केलेला धारासना सत्याग्रहसुद्धा महत्त्वाचा होता.

## चले जाव चळवळ

**९. भारतातील चले जाव चळवळ स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. १४ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणी सभेने 'छोडो भारत'चा ठराव मंजूर केला.

ii. ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे मौलाना आझाद यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या बैठकीत या ठरावावर शिक्कामोर्तब केले गेले.

iii. 'चले जाव' चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधीजींकडे देण्यात आले.

iv. महात्मा गांधींनी भारतीयांना 'करेंगे या मरेंगे' हा संदेश दिला.

v. ही चळवळ दडपून टाकण्यासाठी ९ ऑगस्ट १९४२ च्या पहाटे राष्ट्रीय सभेच्या प्रमुख नेत्यांना अटक करून तुरुंगात टाकले.

vi. या घटनेमुळे भारतीय जनता संतप्त होऊन रस्त्यावर आली.

vii. मुंबई, पुणे, बनारस, दिल्ली, मीरत, मथुरा, अलाहाबाद येथे ब्रिटिशांच्या विरोधात निषेध सभा झाल्या.

viii. सत्याग्रहींनी प्रशासनाची सूत्रे हाती घेऊन क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारची स्थापना केली.

ix. बिहारमध्ये पूर्णिया, उत्तर प्रदेशात बलिया, बंगालमध्ये मिदनापूर येथे प्रतिसरकारे स्थापन झाली.

x. चले जाव चळवळीचा प्रसार भारताबाहेर आग्नेय आशिया, चीन, जपानमध्ये स्थायिक झालेल्या भारतीयांपर्यंत झाला.

## भारत स्वतंत्र झाला

**१०. चले जाव चळवळीनंतर भारत स्वतंत्र कसा झाला?**

**उत्तर:** i. चले जाव चळवळीचा प्रसार संपूर्ण भारतात तसेच भारताबाहेर आग्नेय आशिया, चीन, जपानमध्ये स्थायिक झालेल्या भारतीयांपर्यंत झाला.

ii. या चळवळीपासून प्रेरणा घेऊन रासबिहारी बोस यांनी जपानमध्ये आझाद हिंद सेनेची स्थापना केली.

iii. पुढे या संघटनेचे नेतृत्व सुभाषचंद्र बोस यांनी केले.

iv. त्यांनी ब्रिटिशविरोधी लढ्यासाठी इंग्लंडच्या शत्रूराष्ट्रांची मदत घेण्याची तयारी ठेवली.

v. दुसऱ्या महायुद्धात झालेल्या इंग्लंडच्या खच्चीकरणाने भारतावर फार काळ सत्ता टिकविता येणार नाही अशी जाणीव इंग्रजांना झाली.

vi. भारतावरील साम्राज्यवाद सोडून देताना इंग्रजांनी अखंड देशाची फाळणी करून भारत आणि पाकिस्तान अशी द्विराष्ट्रे निर्माण केली.

vii. अशा तऱ्हेने, भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला.

## डॉ. सन्-येत्-सेन

**११. डॉ. सन्-येत्-सेन यांचे चीनच्या स्वातंत्र्य चळवळीतले योगदान स्पष्ट करा.**

**किंवा**

**डॉ. सन्-येत्-सेन यांना चीनचे राष्ट्रपिता का म्हणतात?**

**उत्तर:** i. डॉ. सन्-येत्-सेन हे चीनमधील राष्ट्रवादी नेते होते.

ii. त्यांनी चीनमधील अनेक संघटनांना एकत्र करून 'तुंग मेंग हुई' ही प्रमुख संघटना स्थापन केली.

iii. १० ऑक्टोबर १९११ मध्ये, हँको येथील बॉम्बस्फोटाने चीनमध्ये क्रांतीची सुरुवात झाली.

iv. कोमिंगटांग पक्षाला चीनच्या काही भागात वर्चस्व मिळाल्याने डॉ. सन्-येत् -सेन यांनी प्रजासत्ताकाची घोषणा करून ते स्वत: अध्यक्ष झाले.

v. पहिल्या महायुद्धाच्या काळात जपानने चीनसमोर २१ मागण्या ठेवल्या, या मागण्या फेटाळून चीनने मित्र राष्ट्रांचा पाठिंबा मिळवला.

vi. कोमिंगटांग पक्षाची ताकद वाढल्याने चीनने कॅन्टन शहरावर ताबा मिळवला.

vii. या पक्षाने लोकशाही, राष्ट्रवाद व समाजवाद या डॉ. सन्-येत्-सेन यांच्या तत्त्वांवर आधारित प्रजासत्ताकाची स्थापना केली.

viii. या तत्त्वांतून सर्वसामान्य चिनी जनतेत जागृती झाली.

ix. राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कार्यात रशियाची मदत घेऊन औद्योगिकीकरण, कृषीसुधारणा यांवर भर दिला. तसेच लष्करी महाविद्यालयाची स्थापना केली.

x. डॉ. सन्-येत्-सेन यांनी चीनला बंधमुक्त करण्यासाठी फार मोठे योगदान दिले म्हणून त्यांना चीनचा राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाते.

***१२. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील मवाळ व जहालांच्या योगदानाची माहिती लिहा.**

**उत्तर:** राष्ट्रीय सभेच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीचे दोन कालखंड होते: मवाळ कालखंड आणि जहाल कालखंड

**मवाळ कालखंड (इ.स. १८८५ ते इ.स. १९०५):**

i. मवाळ नेत्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीची पायाभरणी केली.

ii. या काळात भारतीयांनी आपल्या मागण्या अर्ज आणि विनंत्या या मार्गाने मागितल्या.

iii. मवाळ नेत्यांचा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास होता.

iv. मवाळ नेत्यांनी जनतेच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली.

v. मवाळ नेत्यांमध्ये व्योमेशचंद्र बॅनर्जी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, फिरोजशहा मेहता, न्या.रानडे, ना. गोखले, दादाभाई नौरोजी, न्या. तेलंग, न्या. चंदावरकर, गो. ग. आगरकर, आनंद मोहन बोस, लाल मोहन घोष, सी. सुब्रह्मण्यम् अय्यर, बद्रुद्दिन तय्यबजी, दिनशॉ वाँच्छा, रमेशचंद्र दत्त, शंकरन नय्यर, पी. आनंदा चार्लू, एन. जी. रंगा इत्यादींचा समावेश होता.

vi. भारतीय जनतेमध्ये जनजागृती करून राष्ट्रवादी चळवळीची पायाभरणी केली.

**जहाल कालखंड (इ.स.१९०५ ते इ.स.१९२०):**

i. जहालांची विचारसरणी मवाळांच्या विचारसरणीपेक्षा भिन्न होती.

ii. मवाळांचा सनदशीर मार्ग जहालांना मान्य नव्हता.

iii. ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर त्यांचा विश्वास नव्हता.

iv. त्यांनी आपल्या मागण्या आक्रमकपणे मांडून ब्रिटिश सरकारच्या अन्यायी व जुलमी धोरणांचा प्रतिकार केला.

v. पंजाबमधील लाला लजपतराय, महाराष्ट्रातील बाळ गंगाधर टिळक (लोकमान्य टिळक) आणि बंगालमधील बिपीनचंद्र पाल हे प्रमुख

जहालमतवादी नेते होते. हे लाल-बाल-पाल म्हणून ओळखले जात.

vi. जहाल मतवाद्यांनी स्वराज्य, स्वदेशी, विदेशी मालावर बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही चतु:सूत्री मांडली.

**१३. भारतीय स्वातंत्र्य चळवळीची माहिती खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.**

**i. चलेजाव चळवळ ii. आझाद हिंद सेना**

**[जुलै १५]**

**उत्तर:** i. प्र. ५ मधील (९) पाहा.

ii. प्र. ४ मधील (९) पाहा.

**१४. म. गांधी युगाची माहिती खालील मुद्द्यांनुसार लिहा.**

**[मार्च १६]**

**i. जालियनवाला बाग हत्याकांड**

**ii. असहकार चळवळ**

**उत्तर:** i. प्र. ४ मधील (८) पाहा.

ii. प्र. ५ मधील (७) पाहा.

## लक्षात ठेवण्यासारख्या महत्त्वाच्या घटना

| वर्ष | घटना | महत्त्व / परिणाम / कारणे |
|---|---|---|
| १४५३ | कॉन्स्टॅन्टिनोपलचा ऑटोमन तुर्कांनी पाडाव केला. | युरोपियनांचा पूर्वेकडे जाण्याचा सर्वांत कमी अंतराचा खुष्कीचा मार्ग बंद झाला. |
| | **भारत** | |
| १४९८ | पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा भारताच्या कालिकत (कोझीकोड) बंदरात पोहोचला. | |
| १७५७ | प्लासीच्या लढाईतील इंग्रजांचा विजय | – |
| १८५७ | १८५७ चा ऐतिहासिक उठाव, जो ब्रिटिशांकडून दडपण्यात आला. | – |
| १८८५ | २८ डिसेंबर १८८५ रोजी राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन मुंबई येथे गोकुळदास तेजपाल संस्कृत पाठशाळेच्या मैदानावर भरले होते. | देशभरातून ७२ प्रतिनिधी अधिवेशनासाठी हजर होते. राष्ट्रीय चळवळीची वाटचाल सुरू होण्यास यामुळे मदत झाली. |
| १८८५ ते १९०५ | मवाळ कालखंड. | – |
| १९०५ ते १९२० | जहालमतवादी कालखंड. | – |
| १९०५ | १६ ऑक्टोबर १९०५ मध्ये लॉर्ड कर्झन याने बंगालची फाळणी घडवून आणली. | फाळणीच्या विरोधात वंग भंग चळवळ उभी राहिली. |

| | | |
|---|---|---|
| १९११ | १२ डिसेंबर १९११ रोजी ब्रिटिश सम्राट पंचम जॉर्ज यांनी बंगालची फाळणी रद्द केली. | – |
| १९१९ | रौलट अॅक्ट पास केला. | अन्यायकारी स्वरूप असलेल्या या कायद्यास 'काळा कायदा' असे संबोधण्यात आले. |
| | १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर येथे जालियनवाला मैदानात रौलट अॅक्टला विरोध करण्यासाठी सभा आयोजित करण्यात आली होती. | या सभेवर ब्रिटिश अधिकारी जनरल डायर याने बेछूट गोळीबार करण्याचे आदेश दिले. ज्यात शेकडो लोक मृत्युमुखी पडले. |
| | १ ऑगस्ट १९२० रोजी टिळकयुगाचा अस्त झाला. | गांधीयुगाची सुरुवात झाली. |
| १९२० | नागपूर येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरून असहकाराचा ठराव संमत झाला. | ब्रिटिश माल, सरकारी कार्यालय व न्यायालय, ब्रिटिश शाळा, महाविद्यालये, पदव्या, कायदेमंडळाच्या निवडणुका इ. वर बहिष्कार घालण्यात आला. |
| १९२२ | गोरखपूर, उत्तर प्रदेश येथील चौरीचौरा येथे काढण्यात आलेल्या शांततापूर्ण मिरवणुकीवर ब्रिटिश पोलिसांनी गोळीबार केला. | संतप्त जमावाने पोलीस चौकीला आग लावली. महात्मा गांधींनी या घटनेने व्यथित होऊन असहकार चळवळ स्थगित केली. |
| १९३० | १२ मार्च १९३० रोजी गांधीजींनी दांडी येथून मिठाच्या सत्याग्रहास सुरुवात केली. साबरमती ते दांडी हा ३८५ किमी प्रवास त्यांनी पायी २५ दिवसांत पूर्ण केला. ६ एप्रिल १९३० रोजी दांडीच्या समुद्रकिनाऱ्यावरील मीठ उचलून गांधीजींनी कायदेभंग केला. | सविनय कायदेभंग चळवळीला देशभरात सुरुवात झाली. |
| १९४२ | १४ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणी सभेने 'छोडो भारत' चा ठराव मंजूर केला. | – |
| | ९ ऑगस्ट १९४२ च्या पहाटे राष्ट्रीय सभेच्या प्रमुख नेत्यांना अटक करून तुरुंगात टाकले. | भारतीय जनता संतप्त होऊन रस्त्यावर आली. देशात अनेक ठिकाणी निषेध सभा झाल्या. सत्याग्रहींनी प्रतिसरकारे स्थापन केली. |
| १९४७ | १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. | – |
| १९५० | २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक परिश्रमातून साकार झालेली राज्यघटना अंमलात आली. | जगाच्या इतिहासात भारत हे लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून उदयास आले. |
| | **चीन** | |
| १९११ | १० ऑक्टोबर १९११ मध्ये हँको येथील बॉम्बस्फोटाने चीनमध्ये क्रांतीची सुरुवात झाली. | कोमिंगटांग पक्षाला चीनच्या काही भागांत वर्चस्व मिळाल्याने डॉ. सन्-येत्-सेन यांनी प्रजासत्ताकाची घोषणा केली व ते स्वतः अध्यक्ष झाले. |
| १९४९ | १ ऑक्टोबर १९४९ रोजी चिनी जनतेच्या पाठिंब्याने माओ-त्से-तुंग यांनी 'लाल क्रांती' यशस्वी केली. | – |

## महत्त्वाच्या संज्ञा

| | |
|---|---|
| **'आसू'** | ग्रीकांनी सूर्य उगवणाऱ्या दिशेचा म्हणून आशिया खंडास हे नाव दिले. |
| **'राष्ट्रीय शोक दिन'** | १६ ऑक्टोबर १९०५, बंगालच्या फाळणीचा दिवस 'राष्ट्रीय शोक दिन' म्हणून पाळण्यात आला. |
| **'वंग-भंग'** | बंगालच्या फाळणीविरोधात सुरू झालेली चळवळ. |
| **'दांडी'** | मिठाचा कायदा मोडून, सत्याग्रह करण्यासाठी गांधीजींनी गुजरातमधील निवडलेले ठिकाण. |
| **'काळा कायदा'** | १९१९ मध्ये संमत झालेला रौलट ॲक्ट. भारतीयांच्या राजद्रोही कारवाया रोखण्यासाठी असलेला हा कायदा अन्यायकारक असल्याने यास 'काळा कायदा' असे संबोधण्यात आले. |

## महत्त्वाची नावे

| | |
|---|---|
| **ॲलन ऑक्टोव्हिअन ह्यूम** | सेवानिवृत्त इंग्रज अधिकारी. ज्यांच्या पुढाकारातून १८८५ मध्ये अखिल भारतीय पातळीवर राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. |
| **व्योमेशचंद्र बॅनर्जी** | थोर कायदेपंडित व विचारवंत.<br>ते राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. |
| **i. लाला लजपतराय**<br>**ii. बाळ गंगाधर टिळक (लोकमान्य टिळक)**<br>**iii. बिपीनचंद्र पाल** | लाल, बाल व पाल म्हणून प्रसिद्ध जहालमतवादी नेते.<br>स्वराज्य, स्वदेशी, परकीय मालावर बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीच्या माध्यमातून राजकीय जनजागृती घडवून आणली. |
| **लॉर्ड कर्झन** | १९०५ मध्ये बंगालची फाळणी अंमलात आणली. |
| **सुरेंद्रनाथ बॅनर्जी** | बंगालच्या फाळणीविरोधातील 'वंग-भंग' चळवळीचे नेतृत्व केले. |
| **रवींद्रनाथ टागोर** | बंगालच्या फाळणीविरोधात राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक म्हणून रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित केला.<br>जालियनवाला बाग हत्याकांडाच्या निषेधार्थ इंग्रज सरकारने दिलेली 'सर' ही पदवी परत केली. |
| **ब्रिटिश सम्राट पंचम जॉर्ज** | १२ डिसेंबर १९११ रोजी दिल्ली येथे भव्य दरबार भरवून बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा केली. |
| **डॉ. ॲनी बेझंट** | होमरूल चळवळ सुरू केली. |
| **महात्मा गांधी** | राष्ट्रपिता. सत्य, अहिंसा व सत्याग्रह या त्यांच्या तत्त्वांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यास नवी दिशा दिली. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग या चळवळी सुरू केल्या व चले जाव चळवळ जी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात निर्णायक मानली जाते तिचे नेतृत्व केले. |
| **जनरल डायर** | अ. जालियनवाला बाग हत्याकांडास जबाबदार असलेला ब्रिटिश अधिकारी.<br>ब. त्याने १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसरमधील जालियनवाला बागेत सभेसाठी जमलेल्या लोकांवर बेछूट गोळीबार करण्याचे आदेश दिले. ज्यात शेकडो लोक मृत्युमुखी पडले. |
| **सरोजिनी नायडू** | १९३० मध्ये धारासना सत्याग्रहाचे नेतृत्व केले. |
| **मौलाना आझाद** | ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथील अखिल भारतीय काँग्रेसच्या बैठकीचे अध्यक्ष. |

| | |
|---|---|
| **क्रांतिसिंह नाना पाटील** | सातारा, महाराष्ट्र येथे प्रतिसरकारची स्थापना. |
| **रास बिहारी बोस** | जपानमध्ये 'आझाद हिंद सेनेची' स्थापना. |
| **सुभाषचंद्र बोस** | अ. रास बिहारी बोस यांच्या नंतर 'आझाद हिंद सेनेचे' नेतृत्व केले.<br>ब. भारतीयांना 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दूँगा' असे आवाहन केले.<br>क. आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून 'चलो दिल्ली' हा नारा दिला. |
| **पंडित जवाहरलाल नेहरू** | स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान. |
| **डॉ. राजेंद्र प्रसाद** | स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती. |
| **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** | मसुदा समितीचे अध्यक्ष. |
| **डॉ. सन्-येत्-सेन (चीनचे राष्ट्रपिता)** | चीनचे राष्ट्रपिता. कोमिंगटांग पक्षाचे अध्यक्ष. 'तुंग मेंग हुई' ही संघटना स्थापन केली. |
| **माओ-त्से-तुंग** | चीनचे साम्यवादी नेते. ज्यांनी सोव्हिएत रशिया व अमेरिकेची मदत घेऊन राष्ट्रीय चीनची स्थापना केली. १ ऑक्टोबर १९४९ रोजी त्यांनी 'लाल क्रांती' यशस्वी करून दाखविली. |

## उजळणी तक्ता

**गांधी युग (१९२० ते १९४७)**

- असहकार चळवळ, १९२० → ब्रिटिश सत्तेला विरोध करण्यासाठी
- सविनय कायदेभंग, १९३० → ब्रिटिशांचे जुलमी व अन्यायकारी कायदे तोडण्यासाठी
- चले जाव चळवळ, १९४२ → 'करेंगे या मरेंगे' म्हणत ब्रिटिशांविरुद्ध उठाव

## ब. अफ्रीका

**खलील प्रशनंची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा**

### पार्श्वभूमी

**१. जगाच्या इतिहासात आफ्रिका खंड कशा प्रकारे विभागला आहे?**

**उत्तर:** जगाच्या इतिहासात आफ्रिका खंड धार्मिक व वांशिक-दृष्ट्या विभागला आहे.

**२. आफ्रिका खंडाच्या उत्तर व दक्षिण या दोन भागांमध्ये कोणत्या प्रकारचा फरक आहे?**

**उत्तर:** उत्तर व दक्षिण या दोन भागांच्या सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय इतिहासात फार फरक आहे.

**•३. आफ्रिकेच्या चार प्रादेशिक विभागांची नावे सांगा.**

**उत्तर:** आफ्रिकेचे चार प्रादेशिक विभाग पुढीलप्रमाणे:

i. कृष्णवर्णीय आफ्रिका

ii. युनियन ऑफ साऊथ आफ्रिका व ऱ्होडेशिया

iii. इजिप्त

iv. माघ्रेब

**४. आफ्रिका खंडाच्या अंतर्गत प्रदेशाची माहिती मिळविणाऱ्या युरोपातील प्रवाशांची नावे सांगा.**

**उत्तर:** युरोपियन धाडसी प्रवासी मंगोपार्क, कॅप्टन स्पेक, सर सॅम्युएल बेकर, डेव्हिड लिव्हिंगस्टन व अमेरिकन वृत्तपत्रकार एच. एम. स्टॅन्ले यांनी आफ्रिकेच्या अंतर्गत भागांची माहिती मिळविली.

**५. युरोपियन राष्ट्रांवर औद्योगिकीकरणाचा काय परिणाम झाला?**

**उत्तर:** औद्योगिकीकरणामुळे युरोपियन राष्ट्रांची भरभराट झाली. त्यांनी स्वस्त दरात कच्चा माल मिळविण्यासाठी व पक्का माल विकण्यासाठी आशिया व आफ्रिका खंडांत वसाहती स्थापन करण्यास सुरुवात केली.

***६. युरोपीय राष्ट्रांचे लक्ष आफ्रिकेवर का केंद्रीभूत झाले?**

**उत्तर:** युरोपीय राष्ट्रांचे लक्ष आफ्रिकेवर केंद्रीभूत झाले कारण:

i. आफ्रिका खंडाचा विस्तार व तेथील मुबलक खनिजद्रव्ये युरोपीय साम्राज्यवाद्यांना १९ व्या शतकाच्या शेवटी ज्ञात झाले.

ii. युरोपीय राष्ट्रांना कच्चा माल मिळविण्यासाठी व पक्का माल विकण्यासाठी नवी बाजारपेठ आवश्यक होती.

***७. पाश्चिमात्यांच्या वसाहतवादामुळे आफ्रिकेतील लोकांच्या उद्योग व व्यवसायावर कोणता परिणाम झाला?**

**उत्तर:** i. पाश्चिमात्यांच्या वसाहतवादामुळे आफ्रिकेला कच्चा माल पुरवणारी वसाहत व पक्का माल विक्रीची बाजारपेठ असे स्वरूप प्राप्त झाले.

ii. मूळ व्यवसाय व उद्योगधंदे डबघाईला आले.

iii. अनेक उद्योग बंद पडले आणि तेथे दारिद्र्य निर्माण झाले.

**८. युरोपियनांनी आफ्रिकेत साम्राज्य निर्माण करण्यासाठी कोणत्या नीतीचा अवलंब केला?**

**उत्तर:** i. युरोपियनांनी स्थानिक लोकांवर आपली संस्कृती, धर्म लादण्याचा प्रयत्न केला.

ii. तेथील निरनिराळ्या जमातीत द्वेषभावना निर्माण करून वसाहतीत नैतिक अध:पतन निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

iii. वसाहतवादी राष्ट्रांनी स्वत:च्या देशात लोकशाही असूनही आफ्रिकेतील वसाहतींबाबत मात्र त्यांचे धोरण साम्राज्यवादी होते.

iv. या वसाहतींवर युरोपियनांनी आपले आर्थिक व राजकीय वर्चस्व निर्माण करून तेथे आपले साम्राज्य निर्माण केले.

## गुलामांचा व्यापार

---

**९. युरोपीय राष्ट्रांनी आफ्रिकेतील वसाहतींचा वापर व्यापारासाठी कसा केला?**

**उत्तर:** i. युरोपीय राष्ट्रांनी आफ्रिका खंडात व्यापार आणि उद्योगधंदे सुरू केले.

ii. या वसाहतींचा वापर पूर्वेकडील देशांत मुख्यत: सोने, खनिज, हस्तीदंत इ. निर्यात करण्यासाठी केला जात असे.

iii. गुलामांचा व्यापार हा प्रमुख उद्योग होता जो सर्वप्रथम पोर्तुगिजांनी सुरू केला.

***१०. निग्रो गुलामांच्या मुक्ततेसाठी झालेली चळवळ लिहा.**

**उत्तर:** i. गुलामांचा व्यापार आफ्रिकेत फार पूर्वीपासून चालत आला होता.

ii. अमानुषपणा, निर्दयीपणा आणि अन्याय हे गुलामांच्या व्यापाराचे आधारस्तंभ होते.

iii. गुलामांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचारांची माहिती युरोपातील सामान्य जनतेला कळू लागली तेव्हा साहजिकच निग्रो गुलामांबद्दल सहानुभूती निर्माण झाली.

iv. त्यांच्या मुक्ततेसाठी मोठ्या प्रमाणावर चळवळी निर्माण झाल्या.

v. अमेरिकेमध्ये गुलामगिरी प्रतिबंधक चळवळीने केलेल्या कार्यामुळे अमेरिका खंडातील गुलामांची मुक्तता झाली.

## प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा.

### आफ्रिकेतील साम्राज्यवाद

***१. युरोपीय राष्ट्रांचे आफ्रिकेकडे लक्ष वेधले गेले.**

**उत्तर:** i. युरोपियन प्रवाशांनी आफ्रिका खंडाच्या अंतर्गत भागांचा शोध घेतल्यामुळे या खंडाची माहिती युरोपीय राष्ट्रांना झाली.

ii. आफ्रिका खंडाचा विस्तार आणि तेथील मुबलक खनिज द्रव्ये युरोपीय साम्राज्यवाद्यांना १९ व्या शतकाच्या शेवटी ज्ञात झाले.

iii. औद्योगिकीकरणामुळे युरोपीय राष्ट्रांना कच्चा माल मिळविण्यासाठी व पक्का माल विकण्यासाठी नवी बाजारपेठ आवश्यक होती.

iv. यामुळे बऱ्याच युरोपियन राष्ट्रांत आफ्रिकेत वसाहतीकरणासाठी स्पर्धा सुरू झाल्या.

अशा प्रकारे, औद्योगिकीकरण, वाढती लोकसंख्या, साम्राज्यवाद या कारणांमुळे युरोपियन राष्ट्रांचे लक्ष आफ्रिका खंडाकडे वेधले गेले.

**२. बेल्जियमने आफ्रिकेत आपली वसाहत स्थापन केल्यानंतर बाकी युरोपीय राष्ट्रांनी आफ्रिकेत आपल्या वसाहती स्थापन करण्यास सुरुवात केली.**

**उत्तर:** i. आफ्रिकेत लक्ष घालणारे बेल्जियम हे पहिले युरोपीय राष्ट्र होय. बेल्जियमचा राजा दुसरा लिओपोल्ड याने कांगो हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आणले.

ii. आफ्रिका नैसर्गिक साधनसंपत्तीने आणि खनिजांनी संपूर्ण असल्याचे युरोपीय राष्ट्रांना समजले. लिओपोल्डने कांगो प्रदेशातून प्रचंड संपत्ती मिळवल्यामुळे युरोपातील इतर देशांनाही आफ्रिकेविषयी आर्थिक आकर्षण वाटू लागले.

iii. आफ्रिका खंडात साम्राज्य विस्तार करण्यास वाव आहे, तेथे सोने, चांदीच्या खाणी आहेत हे युरोपीय राष्ट्रांना ज्ञात झाले होते.

iv. इ. स. १८७१ नंतर युरोपीय राष्ट्रांनी आफ्रिकेत साम्राज्यविस्ताराच्या दृष्टीने वाटचाल केली.

यामुळेच, बेल्जियमने आफ्रिकेत वसाहत स्थापन केल्यावर इतर युरोपीय राष्ट्रांनी आपल्या वसाहती आफ्रिकेत स्थापन करण्यास सुरुवात केली.

## आफ्रिकेतील निर्वसाहतीकरण

***३. आफ्रिका खंडात निर्वसाहतीकरणाची प्रक्रिया उशिरा सुरू झाली.**

**उत्तर:** आफ्रिका खंडात राष्ट्रवादी भावनेचा उदय होऊनही खालील कारणांमुळे निर्वसाहतीकरणाची प्रक्रिया उशिरा सुरू झाली.

i. आफ्रिका खंडातील समृद्ध नैसर्गिक संपत्तीवर दीर्घकाळ कब्जा ठेवण्याचा वसाहतवादी राष्ट्रांचा प्रयत्न होता.

ii. आफ्रिकन समाजाची अनेक जमातींत विभागणी झाल्याने त्यांना वसाहतवादी राष्ट्रांविरुद्ध लढा तीव्र करता आला नाही.

iii. युरोपियन साम्राज्यवादाच्या विरोधात कुठलीही आक्रमक चळवळ नव्हती. राष्ट्रवादी चळवळी दुबळ्या होत्या.

iv. आफ्रिकन समाजामध्ये पाश्चात्त्य शिक्षण व तंत्रज्ञान उशिरा पोहोचले.

***४. वसाहतींमध्ये राष्ट्रवादी भावनेचा उदय झाला.**

**उत्तर:** i. लोकशाही, समता, उदारमतवाद यांसारख्या संकल्पना नवशिक्षित मध्यमवर्गास समजू लागल्या. ज्यामुळे वसाहतीत राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली.

ii. आशियातील राष्ट्रवादी चळवळींनी आफ्रिकन राष्ट्रवाद प्रभावित झाला.

iii. आफ्रिकन लोकांचे लक्ष विशेषत: भारतीय राष्ट्रवादी चळवळींकडे वेधले गेले.

iv. महात्मा गांधींच्या दक्षिण आफ्रिकेतील अहिंसात्मक चळवळींनी आफ्रिकन राष्ट्रवादी प्रभावित झाले.

v. अनेक आंतरराष्ट्रीय राजकीय घटनांचा आफ्रिकन लोकांच्या मनावर परिणाम होऊन त्यांनी पूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली.

## प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा.

### आफ्रिकेतील साम्राज्यवाद

**१. आफ्रिकेमध्ये युरोपियनांची पहिली वसाहत कशी स्थापन झाली?**

**उत्तर:** i. आफ्रिकेत लक्ष घालणारे युरोपातील बेल्जियम हे पहिले राष्ट्र होय.

ii. बेल्जियमचा राजा दुसरा लिओपोल्डने कांगो हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आणले.

iii. कांगोमधील लोकांवर त्याने अत्याचार केले आणि थोड्या कालावधीत प्रचंड संपत्ती गोळा केली.

iv. लोकांवर केलेल्या अन्याय व अत्याचारामुळे इ.स. १९०८ मध्ये बेल्जियम कायदेमंडळाने हा प्रदेश लिओपोल्डच्या ताब्यातून काढून घेतला व हा प्रदेश बेल्जियमची वसाहत म्हणून ओळखला जाऊ लागला.

अशा तऱ्हेने, युरोपीय राष्ट्रांची पहिली वसाहत आफ्रिकेत स्थापन झाली.

२. **आफ्रिकेच्या कोणत्या प्रदेशात ब्रिटिशांनी वसाहती स्थापन केल्या?**

**उत्तर:** i. ब्रिटिशांनी आफ्रिकेतील गुलामांच्या व्यापारासाठी सिएरा लिऑनमध्ये ठाणी स्थापन केली व पुढे चालून मुक्त केलेल्या निग्रो गुलामांसाठी तेथेच वसाहत स्थापन केली.

ii. १९०६ पर्यंत इंग्लंडच्या वर्चस्वाखाली केप ऑफ गुड होप, नाताळ, ट्रान्सवाल, ऱ्होडेशिया, ऑरेंज फ्री स्टेट, न्यासालँड, झांझीबार, पंम्बा व युगांडा इत्यादी प्रदेश आलेले होते.

iii. १९२० मध्ये केप ऑफ गुड होप, नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सवाल या चार ब्रिटिश वसाहतींचे एकत्रीकरण होऊन त्यांचे एक संघराज्य निर्माण झाले.

***३. वसाहतवादाविरोधात मध्यमवर्गीयांची प्रतिक्रिया स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. प्रत्येक वसाहतवादी राष्ट्राने राज्यकारभाराच्या सोयीसाठी दुय्यम दर्जाचे कर्मचारी मिळावेत म्हणून वसाहतींमध्ये शिक्षणसंस्था काढल्या.

ii. युरोपियनांनी आपली राज्यपद्धती, भाषा, संस्कृती, धर्म वसाहतींवर लादण्याचा प्रयत्न केला.

iii. पाश्चिमात्य शिक्षण व संस्कृतीशी आलेल्या संपर्कामुळे वसाहतींमध्ये मध्यमवर्ग उदयास आला. यामध्ये वकील, शिक्षक, सामान्य व्यापारी इत्यादींचा समावेश होता.

iv. वसाहतींतील नवशिक्षित समुदायास लोकशाही, राष्ट्रवाद, उदारमतवाद यांसारख्या संकल्पना समजू लागल्या.

v. स्वत:बद्दलच्या चिकित्सक विश्लेषणातून या मध्यमवर्गास आपल्या दरिद्रीपणाला, आर्थिक शोषणाला, गुलामगिरीला पाश्चिमात्यच जबाबदार असल्याची भावना प्रबळ होत गेली.

vi. यामुळे, वसाहतींमध्ये राष्ट्रवादाची भावना जागृत होऊन स्वातंत्र्याचा विचार वाढीस लागला.

***४. युरोपीय साम्राज्यवादी राष्ट्रांना वसाहती सोडून जाणे का भाग पडले? [जुलै १६]**

**उत्तर:** i. आंतरराष्ट्रीय स्तरावर वसाहतवादाला विरोध होऊ लागला.

ii. दोन्ही महायुद्धांमुळे वसाहतवादी राष्ट्रेही कमकुवत झाली.

iii. दुसऱ्या महायुद्धानंतर, राष्ट्रवादी चळवळी तीव्र झाल्या आणि लवकरच आशिया व आफ्रिका खंडांत पसरल्या.

iv. या राष्ट्रवादी चळवळींतून दोन प्रक्रिया घडून आल्या. एक तर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी राष्ट्रवादी गटांशी करार करून वसाहतींमधून काढता पाय घेणे किंवा दुसरे म्हणजे वसाहतींवर वर्चस्व कायम राहण्यासाठी आंदोलने चिरडणे.

v. ही आंदोलने दडपणे अशक्य झाल्यामुळे इंग्लंडने वसाहतींवरील आपला ताबा सोडला.

vi. फ्रान्स, हॉलंड, पोर्तुगाल वगैरे राष्ट्रांनी आपली सत्ता टिकवण्यासाठी राष्ट्रीय आंदोलने चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला.

vii. परंतु, प्रबळ होत गेलेल्या राष्ट्रवादी शक्तींच्या व जागतिक मतांच्या दडपणाखाली शेवटी युरोपीय साम्राज्यवादी राष्ट्रांना वसाहती सोडून जाणे भाग पडले.

**५. आफ्रिका खंडाच्या निर्वसाहतीकरणाच्या वेळी घडलेल्या काही राष्ट्रीय चळवळींबद्दल माहिती लिहा.**

**उत्तर:** आफ्रिका खंडाच्या निर्वसाहतीकरणाच्या वेळी घडलेल्या काही राष्ट्रीय चळवळी पुढीलप्रमाणे होत:

i. गोल्ड कोस्ट वसाहतीत (घाना प्रदेश) क्वाम नक्रूमा यांनी राष्ट्रीय चळवळ संघटित करून १९५७ साली स्वातंत्र्य मिळवले.

ii. केनियाला ब्रिटिशांच्या तावडीतून सोडविण्यासाठी त्यांचा सुप्रसिद्ध नेता जोमो केन्याटा यांनी केनियात माऊ-माऊ चळवळ स्थापन केली.

iii. दक्षिण ऱ्होडेशियामध्ये (आजचा झिम्बाब्वे) रॉबर्ट मुगाबेच्या पेट्रिऑटिक फ्रंट पक्षाने ब्रिटिशांच्या विरोधात लढा देऊन झिम्बाब्वे हा स्वतंत्र देश निर्माण केला.

iv. दक्षिण आफ्रिकेत वसाहतवादाविरोधात तसेच वर्णभेदाविरुद्ध नेल्सन मंडेला यांनी प्रदीर्घ लढा दिला.

## प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा.

### आफ्रिकेतील साम्राज्यवाद

**१. आफ्रिका खंडातील साम्राज्यवादाविषयी माहिती द्या.**

**उत्तर:** १८ व्या शतकापर्यंत आफ्रिका हा 'अज्ञात खंड' किंवा 'काळे खंड' म्हणून ओळखला जात होता; परंतु युरोपीय धाडसी प्रवाशांच्या अथक प्रयत्नांमुळे आफ्रिकेचा नैसर्गिक संपत्तीने पुरेपूर असलेला प्रदेश जगासमोर आला. आफ्रिकेतील नैसर्गिक साधनसंपत्तीमुळे तेथे वसाहतीकरणासाठी स्पर्धा सुरू झाल्या.

**पोर्तुगाल वसाहतींची स्थापना:**

i. आफ्रिकेत कायमची वसाहत स्थापन करणारे पहिले युरोपियन म्हणजे पोर्तुगीज होय. घाना प्रदेशांच्या किनाऱ्यावर त्यांनी वस्ती केली.

ii. पोर्तुगालने अंगोलाच्या प्रांतात आपले वर्चस्व निर्माण केले. तसेच आफ्रिका खंडाच्या पूर्व किनाऱ्यावर मोझँबिक ही नवीन वसाहत निर्माण केली.

**स्पेन आणि डच वसाहतींची स्थापना:**

i. गिनीकोस्टमधील काही बेटे, मोरोक्कोचा काही भाग व रिओ-डी-ओरोचा काही प्रदेश स्पेनच्या वर्चस्वाखाली आला.

ii. दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन येथे डच लोकांनी पूर्वेकडे जाणाऱ्या जहाजांसाठी पुरवठा केंद्र स्थापन केले आणि या केंद्राचे पुढे मोठ्या वसाहतीत रूपांतर झाले.

iii. डचांनी ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सवाल येथे आपल्या वसाहती निर्माण केल्या.

**फ्रेंच वसाहतींची स्थापना:**

i. फ्रेंचांनी आफ्रिकेतील पश्चिम किनाऱ्यावरील सेनेगल व गेबॉन या महत्त्वाच्या वसाहती आपल्या वर्चस्वाखाली आणल्या.

ii. कांगोच्या उत्तर प्रदेशावर फ्रान्सने आपले वर्चस्व निर्माण केले, तर १८८३ मध्ये आयवरी कोस्ट फ्रान्सने आपल्या साम्राज्याला जोडले.

iii. फ्रान्सने पोर्तुगालवर मात करून नायजेरियाच्या पश्चिमेला असलेला दोहोमे प्रदेश मिळवला.

iv. १९१४ पर्यंत, फ्रान्सने वायव्य आफ्रिकेच्या सहारा वाळवंटापासून पश्चिमेला थेट आयव्हरी कोस्टपर्यंत व फ्रेंचगिनीपर्यंतच्या विशाल प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते.

**ब्रिटिश वसाहतींची स्थापना:**

i. १९०६ पर्यंत, इंग्लंडच्या वर्चस्वाखाली केप ऑफ गुड होप, नाताळ, ट्रान्सवाल, ऱ्होडेशिया, ऑरेंज फ्री स्टेट, न्यासालँड, झांझीबार, पंम्बा व युगांडा इ. प्रदेश आलेले होते.

ii. १९२० मध्ये केप ऑफ गुड होप, नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सवाल या चार ब्रिटिश वसाहतींचे एकत्रीकरण होऊन त्यांचे एक संघराज्य निर्माण झाले.

**जर्मन वसाहतींची स्थापना:**

i. जर्मनीचा चॅन्सलर बिस्मार्कने १८८३ च्या सुरुवातीला व्यापार करण्याच्या माध्यमातून वायव्य आफ्रिकेत जर्मनीची पहिली वसाहत निर्माण केली.

ii. जर्मन संशोधक डॉ. गस्टेब नॉव्टिगल यांस आफ्रिकेतील टोगोलँड, कॅमेरून, आंग्रा, पेव्केना या प्रदेशांवर जर्मन हक्क प्रस्थापित करण्यासाठी पाठविण्यात आले.

iii. तेथील निग्रो राजांशी जर्मन संरक्षणाचा करार करून तेथे जर्मनीचे वर्चस्व निर्माण केले. पुढे या प्रदेशाला टोगोलँड असे नाव पडले.

iv. पुढे नैऋत्य आफ्रिकेवरही जर्मनीने हक्क प्रस्थापित केले.

v. १८८४-८५ च्या बर्लिन परिषदेत टोगोलँड, कॅमेरून व नैऋत्य आफ्रिका या जर्मन वसाहतींना मान्यता देण्यात आली.

***२. आफ्रिका खंडातील ब्रिटिश साम्राज्यवादाविषयी माहिती द्या.**

**उत्तर:** i. ब्रिटिशांनी आफ्रिकेतील गुलामांच्या व्यापारासाठी आफ्रिका खंडात सिएरा लिऑनमध्ये ठाणी स्थापन केली व पुढे मुक्त केलेल्या निग्रो गुलामांसाठी तेथेच वसाहत स्थापन केली.

ii. १९०६ पर्यंत त्यांनी केप ऑफ गुड होप, नाताळ, ट्रान्सवाल, ऱ्होडेशिया, ऑरेंज फ्री स्टेट, न्यासालँड, झांझीबार, पंम्बा व युगांडा इ. प्रदेश मिळवले.

iii. १९२० मध्ये केप ऑफ गुड होप, नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट, व ट्रान्सवाल या वसाहतींचे एकत्रीकरण करून ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली एक संघराज्य निर्माण झाले.

## गुलामांचा व्यापार

***३. आफ्रिकेतील गुलामांच्या व्यापाराबद्दल सविस्तर माहिती लिहा.**

**उत्तर:** i. आफ्रिकेत गुलामांचा व्यापार जुन्या काळापासून चालत आला होता.

ii. पोर्तुगीज व्यापाऱ्यांनी सर्वप्रथम आफ्रिकी गुलाम आपल्या देशात नेले.

iii. अरब व्यापारी येथून गुलाम पळवून नेत व त्यांची मोठ्या प्रमाणावर पश्चिमी आशियाई देशात विक्री करत.

iv. आफ्रिकेतील मागासलेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन पाश्चिमात्य लोकांनी निग्रो जमातीत आपापसात भांडणे लावली.

v. गुलाम पकडण्यासाठी त्यांच्यात लढाया सुरू केल्या. लढायांत पकडण्यात आलेले कैदी गुलाम म्हणून व्यापाऱ्यांना विकण्यात येत होते.

vi. लोकांना बळजबरीने पकडून गुलाम बनविले जात असे व त्यांच्याकडून कष्टाची कामे करण्यासाठी नव्याने स्थापन झालेल्या युरोपीय वसाहतीत गुलाम म्हणून त्यांना विकण्यात येत असे.

vii. गुलामांना अमानुष व क्रूर वागणूक मिळत होती.

viii. गुलामांच्या व्यापारामागील अमानुषता, निर्दयीपणा व त्यांच्यावर होत असलेले अन्याय, अत्याचारांची माहिती युरोपातील सामान्य जनतेला कळू लागली. त्यामुळे या गुलामांबद्दल सहानुभूती निर्माण होऊन त्यांच्या मुक्ततेसाठी चळवळी सुरू झाल्या.

ix. गुलामगिरी प्रतिबंधक चळवळीने केलेल्या कार्यामुळे अमेरिका खंडातील गुलामांची मुक्तता झाली.

x. युरोपातील राष्ट्रांनी जरी गुलामगिरीस प्रतिबंध केला असला, तरी अरब राष्ट्रांत गुलामगिरीस बंदी नव्हती.

xi. आफ्रिकेतील गुलामगिरीवर बंधन घालण्यासाठी पुढे ब्रिटिशांनी न्यासालँड व युगांडा हे प्रदेश आपल्या संरक्षणाखाली घेतले. त्यामुळे तेथून गुलाम मिळविण्याचा अरबांचा मार्ग बंद झाला.

xii. मार्टिन ल्युथर किंग व नेल्सन मंडेला यांनी आपले सर्व आयुष्य खर्च करून गुलामगिरी प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला.

## लक्षात ठेवण्यासारख्या महत्त्वाच्या घटना

| वर्ष | घटना | महत्त्व / परिणाम / कारणे |
|---|---|---|
| १८७१ | युरोपीय राष्ट्रांनी आफ्रिकेत साम्राज्यविस्ताराच्या दृष्टीने वाटचाल सुरू केली. | – |
| १८८३–१९१४ (फ्रेंच वसाहती) | १८८३ मध्ये आयव्हरी कोस्ट फ्रान्सने आपल्या साम्राज्याला जोडले. १९१४ पर्यंत फ्रान्सने वायव्य आफ्रिकेच्या सहारा वाळवंटापासून पश्चिमेला थेट आयव्हरी कोस्टपर्यंत व फ्रेंचगिनीपर्यंतच्या विशाल प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. | – |
| १८८३, १८८४, १८८५ (जर्मन वसाहती) | जर्मनीचा चान्सेलर बिस्मार्कने १८८३ मध्ये व्यापार करण्याच्या माध्यमातून वायव्य आफ्रिकेत जर्मनीची पहिली वसाहत निर्माण केली. १८८४–८५ च्या बर्लिन परिषदेत टोगोलँड, कॅमेरून व नैऋत्य आफ्रिका या जर्मन वसाहतींना मान्यता देण्यात आली. | – |
| १९०६–१९२० (ब्रिटिश वसाहती) | १९०६ पर्यंत इंग्लंडच्या वर्चस्वाखाली केप ऑफ गुड होप, नाताळ, ट्रान्सवाल, ऱ्होडेशिया, ऑरेंज फ्री स्टेट, न्यासालँड, झांझीबार, पंम्बा व युगांडा हे प्रदेश आलेले होते. १९२० मध्ये केप ऑफ गुड होप, नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सवाल या वसाहतींचे एकत्रीकरण होऊन संघराज्य निर्माण झाले. | – |
| १९५७ | ब्रिटिश सत्तेखाली असलेल्या गोल्ड कोस्ट वसाहतीत (आजच्या घाना प्रदेशात) क्वाम नक्रूमा यांनी राष्ट्रीय चळवळ संघटित करून स्वातंत्र्य मिळविले. | – |

## महत्त्वाच्या संज्ञा

| | |
|---|---|
| **'कांगो'** | बेल्जियमचा राजा दुसरा लिओपोल्ड याने कांगो हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आणले. कांगोमधील लोकांवर अत्याचार करून थोड्याच कालावधीत प्रचंड संपत्ती जमा केली. इ.स. १९०८ मध्ये बेल्जियम कायदे मंडळाने हा प्रदेश लिओपोल्डच्या ताब्यातून काढून घेतला. तोच प्रदेश 'बेल्जियमची वसाहत' म्हणून ओळखला जाऊ लागला. अशा प्रकारे युरोपीय राष्ट्रांची पहिली वसाहत आफ्रिकेमध्ये स्थापन झाली. |
| **'गुलामांचा व्यापार'** | आफ्रिकेतील युरोपियन साम्राज्यवादाचे मुख्य कारण गुलामांचा व्यापार होते. युरोपियनांनी आफ्रिकेतील मागासलेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन निग्रो जमातीत आपापसात भांडणे लावली. त्यांच्यात गुलाम पकडण्यासाठी लढाया सुरू झाल्या. लढायांत पकडण्यात आलेले कैदी गुलाम म्हणून व्यापाऱ्यांना विकण्यात येत होते. |

## महत्त्वाची नावे

| | |
|---|---|
| **डॉ. गस्टेब नॉव्टिगल** | जर्मन संशोधक. यांस आफ्रिकेतील टोगोलँड, कॅमेरून, आंग्रा, पेक्केना या प्रदेशांवर जर्मन हक्क प्रस्थापित करण्यासाठी पाठविण्यात आले. |
| **क्वाम नक्रूमा** | यांनी गोल्ड कोस्ट वसाहतीत (घाना प्रदेश) राष्ट्रीय चळवळ संघटित करून १९५७ साली स्वातंत्र्य मिळविले. |
| **जोमो केन्याटा** | केनियातील सुप्रसिद्ध नेते. यांनी माऊ-माऊ चळवळ स्थापन करून केनियाला ब्रिटिशांच्या तावडीतून मुक्त केले. |
| **नेल्सन मंडेला** | आफ्रिकेत निर्माण झालेल्या गुलामगिरी, वंशभेद व वर्णभेद प्रवृत्तीबद्दल लढा देणारा तत्कालिन क्रांतिकारक व युगप्रवर्तक. यांनी आपले सर्व आयुष्य खर्च करून या प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला. दक्षिण आफ्रिकेत वसाहतवादाविरोधात तसेच वर्णभेदाविरुद्ध प्रदीर्घ लढा दिला. |
| **रॉबर्ट मुगाबे** | यांच्या पेट्रिऑटिक फ्रंट पक्षाने ब्रिटिशांच्या विरोधात लढा देऊन पश्चिम ऱ्होडेशिया (झिम्बाब्वे) देश स्वतंत्र केला. |

**उजळणी तक्ता**

## युरोपियन देश व त्यांच्या वसाहती

| | | |
|---|---|---|
| **बेल्जियम** | i. | बेल्जियमचा राजा दुसरा लिओपोल्ड याने कांगो हे स्वतंत्र राज्य अस्तित्वात आणले. १९०८ मध्ये बेल्जियम कायदे मंडळाने हा प्रदेश लिओपोल्डच्या ताब्यातून काढून घेतला. 'बेल्जियमची वसाहत' म्हणून ओळखला जाऊ लागला. |
| **पोर्तुगाल** | i. | आफ्रिकेच्या घाना प्रदेशाच्या किनाऱ्यावर सर्वप्रथम कायमची वसाहत स्थापन करणारे युरोपियन म्हणजे पोर्तुगीज होय. |
| | ii. | कांगो प्रांताच्या दक्षिणेला पोर्तुगालने अंगोला प्रांतावर वर्चस्व मिळविले. तसेच पूर्व किनाऱ्यावर मोझँबिक ही नवीन वसाहत निर्माण केली. |
| **स्पेन** | i. | स्पेनने गिनीकोस्टमधील काही बेटे, मोरोक्कोचा काही भाग व रिओ-डी-ओरोचा काही प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला. |
| **डच** | i. | केपटाऊन येथे पूर्वेकडे जाणाऱ्या जहाजांसाठी पुरवठा केंद्र स्थापन केले, ज्या केंद्राचे नंतर मोठ्या वसाहतीत रूपांतर झाले. |
| | ii. | ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सवाल या प्रदेशांवर वसाहती निर्माण केल्या. |
| **फ्रान्स** | i. | आफ्रिकेतील पश्चिम किनाऱ्यावर सेनेगल व गेबॉन या महत्त्वाच्या वसाहती आपल्या वर्चस्वाखाली आणल्या. |
| | ii. | कांगोच्या उत्तर प्रदेशावर व आयव्हरी कोस्टवर वर्चस्व मिळवून पोर्टीनोव्हो हा प्रदेश फ्रेंच संरक्षित म्हणून घोषित करण्यात आला. |
| | iii. | पोर्तुगालवर मात करून नायजेरियाच्या पश्चिमेला असलेला दोहोमे प्रदेश मिळवला. |
| | iv. | १९१४ पर्यंत फ्रान्सने वायव्य आफ्रिकेच्या सहारा वाळवंटापासून पश्चिमेला थेट आयव्हरी कोस्टपर्यंत व फ्रेंचगिनीपर्यंतच्या विशाल प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. |
| **ब्रिटिश** | i. | केप ऑफ गुड होप, नाताळ, ट्रान्सवाल, ऱ्होडेशिया, ऑरेंज फ्री स्टेट, न्यासालँड, झांझीबार, पंम्बा, युगांडा येथे वसाहती स्थापन केल्या. |
| | ii. | १९२० मध्ये केप ऑफ गुड होप, नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट व ट्रान्सवाल या चार ब्रिटिश वसाहतींचे एकत्रीकरण होऊन त्यांचे एक संघराज्य निर्माण झाले. |
| **जर्मनी** | i. | जर्मनीचा चॅन्सलर बिस्मार्क याने वायव्य आफ्रिकेत जर्मनीची पहिली वसाहत स्थापन केली. |
| | ii. | पुढे जर्मन संशोधक डॉ. गस्टेब नॉव्टिगल यांस आफ्रिकेतील टोगोलँड, कॅमेरून, आंग्रा, पेक्वेना या प्रदेशांवर जर्मन हक्क प्रस्थापित करण्यासाठी पाठविण्यात आले. |
| | iii. | नैऋत्य आफ्रिकेवरही जर्मनीने हक्क प्रस्थापित केले. |
| | iv. | १८८४-८५ च्या बर्लिन परिषदेत टोगोलँड, कॅमेरून व नैऋत्य आफ्रिका या जर्मन वसाहतींना मान्यता देण्यात आली. |